

# कविवर्य मोरोपंत

## वक्तृत्त्व व वाद-विवाद स्पर्धेचे काही यशस्वी मानकरी

* श्री. अविनाश धर्माधिकारी
* डॉ. अरूणा ढेरे
* श्री. समीरण वाळवेकर
* श्री. अभिराम भडकमकर
* श्री. परेश मोकाशी
* व इतर अनेक नामांकित

## वक्तृत्त्व स्पर्धा

### कनिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, **दि. २१ जानेवारी २०२२ रोजी** सकाळी ९ वाजता

**विषय**

१. शारदीय कंठमणी मोरोपंत.
२. जैन धर्माचे वेगळेपण.
३. शेतकरी आंदोलन : माझे चिंतन.
४. राजकारणाची ऐशीतैशी.
५. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव.
६. मनोरंजनाचे नवे विश्व : माझा मोबाईल स्क्रीन.

### वरिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, **दि. २१ जानेवारी २०२२ रोजी** दुपारी १२.०० वाजता

**विषय**

१. मोरोपंतांच्या श्लोककेकावलीतील सौन्दर्यस्थळे
२. राष्ट्रसंत तरूणसागर महाराज : एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व.
३. नवे शैक्षणिक धोरण : माझ्या अपेक्षा.
४. सत्ताकारणातील उत्तरदायित्व.
५. कोरोना : वैश्विक महागुरू.
६. ऑनलाईन माध्यम : शिक्षणाचा नवा आविष्कार.
७. कला प्रवासातील बदलत्या शैली.

## वाद-विवाद स्पर्धा

शनिवार, **दि.२२ जानेवारी २०२२ रोजी** सकाळी ९.०० वाजता

### प्रस्ताव

**''भारतीय स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीत भारतीय स्वतंत्र झाला आहे.''**

## उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धा

शनिवार, दि. **२२ जानेवारी २०२२**रोजी सायं. ४.०० वाजता.

## पारितोषिक वितरण समारंभ

यथावकाश ऑफलाईन घेण्यात येईल.



## कविवर्य मोरोपंत

पेशव्यांचे सावकार श्रीमंत बाबूजी नाईक यांच्याकडे असलेल्या नवरत्नांपैकी एक रत्न म्हणजे कविवर्य मोरोपंत. अफाट प्रतिभेचे पंडित कवी म्हणून त्यांची ख्याती आहे. शब्दावर कमालीचे प्रभुत्व असलेले मोरोपंत हे मराठी साहित्याला लाभलेले लेणे आहे. त्यांनी ७५ हजाराहून अधिक आर्यांची निर्मिती केलेली आहे. बारामतीत त्यांचे सर्वाधिक वास्तव्य होते. कविवर्य मोरोपंतांची बारामती म्हणून बारामती नगरीचा वेगळा लौकिक आहे. पूर्वीची 'भीमथडी' व आताची 'बारामती', मोरोपंतांच्या कार्यकर्तृत्वाने विश्वप्रसिध्द आहे.

बारामतीच्या नावलौकिकात मोलाची भर घालणाऱ्या या महान व्यक्तीचे स्मरण व्हावे या हेतूने १९७२-७३ साली बारामती नगरपरिषदेने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सहकार्याने पुढाकार घेऊन वाद-विवाद व वक्तृत्त्व स्पर्धा सुरू केल्या. २०२१ हे या स्पर्धेचे ४८ वे वर्ष आहे. आजवर या स्पर्धांचे उत्कृष्ट आयोजन तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय करीत आले आहे. या स्पर्धेने अनेक उत्कृष्ट वक्ते महाराष्ट्राला दिलेले आहेत. कविवर्य मोरोपंतांच्या नावे चालत असलेल्या या स्पर्धेचा दर्जा सर्वोत्तम असल्याने या स्पर्धेत सहभागी होणे व स्पर्धा जिंकणे हे अनेक युवकांचे ध्येय असते.

## पारितोषिके

१. वक्तृत्त्व व वाद-विवाद स्पर्धांसाठी दोन स्वतंत्र फिरत्या ढाली.
२. मोरोपंतांच्या विषयावर प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकास विशेष पारितोषिक व स्वतंत्र फिरती ढाल.
३. उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धेसाठी स्वतंत्र फिरती ढाल.
४. मान्यवरांनी विविध विषयांवर जाहीर केलेली अनेक वैयक्तिक रोख बक्षीसे.

## नियमावली

१. स्पर्धकाचे वय २५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
२. गतविजेत्या (प्रथम पारितोषिक प्राप्त) स्पर्धकांना स्पर्धेच्या त्या विभागात पुन्हा सहभागी होता येणार नाही.
३. वक्तृत्व स्पर्धेसाठी दोन वेगळ्या विषयावर बोलणाऱ्या स्पर्धकांचा संघ पाठवावा. संघासाठी प्रवेश शुल्क रू.२००/- राहील.
४. वाद-विवाद स्पर्धेतील संघात अनुकूल व प्रतिकूल बाजू मांडणाऱ्या दोन स्पर्धकांचा समावेश बंधनकारक राहील. संघासाठी प्रवेश शुल्क रू. २००/- राहील. तरच ते वैयक्तिक किंवा सांघिक पारितोषिकासाठी पात्र ठरतील.
५. स्पर्धकास एकूण १० मिनिटे (८+२) वेळ देण्यात येईल.
६. संयोजन समितीने निश्चित केलेल्या क्रमांकानेच स्पर्धकांना भाषण करावे लागेल.
७. स्पर्धकांना प्रवेश अर्जात नमूद केलेले विषय ऐन वेळी बदलता येणार नाहीत.
८. सर्व स्पर्धांबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.
९. स्पर्धकाने आपले रजिस्ट्रेशन ऑनलाईन करावे त्यासाठी स्वतंत्र लिंक दिलेली आहे. त्याचा वापर करावा.
१०. स्पर्धा ऑनलाईन होणार असल्याने स्पर्धेत सहभागी होण्यासाठी असणारी लिंक महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिली जाईल. प्राचार्यांनी ती फक्त सहभागी विद्यार्थ्यांना द्यावी.
११. सहभागी महाविद्यालयाने स्पर्धकास बोलण्यासाठी जागेची उपलब्धता करून द्यावयाची आहे.
१२. स्पर्धक बोलत असताना जर काही तांत्रिक अडचण (उदाहरणार्थ इंटरनेट कनेक्टिव्हिटी) उद्भवू नये याकरीता त्या सहभागी महाविद्यालयाने दक्ष रहावे.
१३. सहभागी महाविद्यालयाने स्पर्धक विद्यार्थ्यांची ओळखपत्र पडताळणी करून स्पर्धेत निवड करताना रजिस्ट्रेशनच्या लिंकमध्ये ओळखपत्राची फोटो कॉपी अपलोड करावी.
१४. विद्यार्थ्याने लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरचा वापर व्याख्यानासाठी करावा.

### सहभाग पत्र

आपल्या संघाच्या सहभागाचे प्राचार्यांच्या सहीचे पत्र दिलेल्या लिंकवर मंगळवार दि. १८/०१/२२ पर्यंत पाठवावे.

**टीप** : सर्व सहभागी संघांनी नोंद घ्यावी की, विजेत्या स्पर्धकांना फिरत्या ढाली त्यांच्या महाविद्यालयाला सुपूर्त कराव्या लागतील व त्यासाठी अनामत रक्कम प्रत्येकी रू. २०००/- जमा करावी लागेल. ढाली नेणे व वेळेवर परत करण्याची जबाबदारी सर्वस्वी त्या महाविद्यालयाची राहील व तसे हमीपत्र द्यावे लागेल.

**www.tccollege.org/moropant**

बुक-पोस्ट

सस्नेह निमंत्रण

प्रति, ------------------------------

------------------------------

------------------------------


प्रेषक
**मा. प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बारामती, ता. बारामती - ४१३ १०२, जि. पुणे.
फोन : ०२११२-२२२४०५ फॅक्स : ०२११२-२२२७२८
**E-Mail :** principal.tccollege@gmail.com
**Website :** www.tccollege.org/moropant


अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

## तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती जि. पुणे

**स्वायत्त**

• नॅक पुनर्मूल्यांकन 'ए+' (सीजीपीए ३.५५) २०१७ •
• उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• उच्च क्षमताशील महाविद्यालय २०१६ यू.जी.सी., नवी दिल्ली •
• उत्कृष्ट एन.एस.एस. पुरस्कार २०१६ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ •
• स्टार महाविद्यालय योजना २०१६ डी.बी.टी. •
• फिस्ट योजना २०१३ डी.एस.टी. •


आणि

## बारामती नगर परिषद, बारामती

द्वारा आयोजित

# कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद ऑनलाईन स्पर्धा २०२२

शुक्रवार, दि. २१/०१/२०२२ शनिवार, दि. २२/०१/२०२२



वर्ष ४८ वे

**डॉ. रंजना नेमाडे**
कार्याध्यक्ष
भ्रमणभाष : ९७६४२९६००३

**डॉ. चंद्रशेखर मुरुमकर**
प्राचार्य